नाशिक महानगरपालिका, नाशिक

पीएम स्वनिधी विभाग

दिनांक : २७.०२.२०२३

## प्रेस नोट

**विषय :- "शासन आपल्या दारी" अभियाना अंतर्गत "स्वयंरोजगार कर्ज वितरण महामेळावा" दिनांक २८/०२/२०२३ रोजी सकाळी ९ वाजता, कालिदास कलामंदिर, शालीमार येथे उपस्थित राहणेबाबत..**

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात "प्रधानमंत्री आत्मनिर्भर पथविक्रेता निधी योजना" (पीएम स्वनिधी) योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अभियानांतर्गत पथविक्रेत्यांना खेळते भांडवल मिळावे या दृष्टीकोनातून सुरु करण्यात आले असून सदरची योजना राज्यात राबविली जात आहे. या योजनेचा महत्वाचा भाग म्हणजे पथविक्रेत्यांचे औपचारिक अर्थव्यवस्थेत समावेशन करणे. लाभार्थी पथविक्रेत्यांनी आर्थिक व्यवहार करतांना, डिजिटल साधनांचा वापर केल्यावर लाभार्थी पथविक्रेत्यांना कर्जाच्या रकम्मे व्यतिरिक्त कॅश बॅक प्राप्त होणार आहे. १० हजाराचे कर्ज मिळालेल्या लाभार्थीना केंद्र शासनाकडून "परिचय बोर्ड" देण्यात येते आहे. तसेच बँकामार्फत पथविक्रेत्यांना ५० हजार, २० हजार व १० हजाराचे कर्ज वितरण करण्यात येत आहे.

त्यानुषंगाने मा.खासदार हेमंत गोडसे यांच्या पुढाकाराने स्वयंरोजगार कर्ज वितरण महामेळावा दिनांक २५ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत महाकवी कालीदास कलामंदिर, शालीमार, नाशिक आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात केंद्र शासन पुरस्कृत पीएम स्वनिधी आणि डे-एनयुएलएम योजनेतर्गत पथविक्रेते, बचतगट व वैयक्तिक स्वयंरोजगार लाभार्थींना बँकामार्फत कर्ज मंजूर/वितरण करण्यात येणार आहे. पीएम स्वनिधी योजनेतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त परिचय बोर्ड सदर कार्यक्रमात पथविक्रेत्यांना वाटप करण्यात येणार असून कर्ज मिळालेल्या सर्व पथविक्रेत्यांना ऑनलाईन आर्थिक व्यवहार करणेसाठी क्यू-आर कोड वाटप करणे, ते कसे वापरावे त्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच पथविक्रेत्यांना/बचतगटातील लाभार्थ्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी केंद्र शासन/राज्य शासन/महामंडळाकडील योजनांची माहिती देण्यात येणार असून त्यांचा लाभ मिळणेसाठी मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त पथविक्रेत्यांनी/बचतगटातील महिलांनी व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी शासनाकडील योजनेचा लाभ घेण्याकरीता उद्या दिनांक २८/०२/२०२३ रोजी सकाळी ९ वाजता महाकवी कालिदास कलामंदिर, शालीमार येथे उपस्थित राहावे असे आवाहन श्रीमती.करुणा डहाळे, उपायुक्त (एनयुएलएम) यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(करुणा डहाळे)
शहर प्रकल्प अधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जा.क्र.NULM/२०२३/४२५

प्रत :-

१) जनसंपर्क अधिकारी यांना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी

२) संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, यांना मनपा वेबसाईट व सोशल मिडियावर प्रसिद्धीसाठी